११ पाठवणीसाठी काही महत्त्वपूर्ण आजार ओळखायला शिका (रोगनिदान)

| अवयव/संस्था | आजार | कोणाला होतो | गावात आजार (लवकर) कसा ओळखायचा? | करायची उपाययोजना | पुढील उपचार |
|---|---|---|---|---|---|
| **१. दात/तोंड** | दात किडणे, पडणे, कीटण | मुले व मोठी माणसे | तपासणीत डागलेले,किडलेले, पडलेले, कीटणवाले दात | दातांच्या डॉक्टरकडे पाठवावे. | कीटण काढणे, भरणे, उपटणे इ. |
| | तोंडातला कर्करोग | मोठी माणसे | तोंडात न दुखणारा दीर्घकाळचा चट्टा, जुनाट जखम, गाठ इ. | डॉक्टरकडे पाठवावे. | शस्त्रक्रिया |
| **२. डोळा** | कमी दिसणे | अ) शाळकरी मुले. | फळ्यावरचे न वाचता येणे, पुस्तक जवळ धरणे | | चष्मा |
| | मोतीबिंदू | ब) चाळीशीनंतर | धान्य निवडताना त्रास, वाचतांना लांब धरणे | | चष्मा |
| | | क) पन्नाशीनंतर | मोतीबिंदू–पांढरटपणा, पिकलेला, न पिकलेला टॉर्चच्या सहाय्याने पहा. | | शस्त्रक्रिया |
| **३. कान** | बहिरेपणा | मुले सर्व, विशेषतः शाळकरी वयातली | माहिती विचारा, कानाचा पडदा/पू तपासा | तीव्र तात्कालिक सूज असल्यास कोझाल, ॲस्पिरिन देणे | |
| | कान वाहणे | | | जुनाट त्रास असल्यास डॉक्टरकडे पाठवा. | |
| **४. घसा** | जुनाट टॉन्सिलदुखी | मुले सर्व (१५ पर्यंत) | माहिती घ्या, घसा तपासा | डॉक्टरकडे पाठवावे. | |
| **५. त्वचा** | कुष्ठरोग | १० वर्षानंतरची व्यक्ती | न खाजणारा किंवा बधिर चट्टा ( अनेक दिवसाचा), हातापायावर कोठेही बधिरता, आखडणे, तळव्यावर जखम, मज्जासूत्रे–नस तपासा (६ ठिकाणी) | प्रा.आ. केंद्राकडे पाठवा | |

| अवयव/संस्था | आजार | कोणाला होतो | गावात आजार (लवकर) कसा ओळखायचा? | करायची उपाययोजना | पुढील उपचार |
|---|---|---|---|---|---|
| ६. श्वसन संस्था | क्षयरोग | अ. मोठी माणसे | जुनाट जड खोकला, बेडक्यात रक्त, वजन/भूक कमी होणे, छातीत क्रेप, पोकळी, क्वचित पाणी | पाठवणी– स्लाईडवर बेडक्याचा नमुना घ्या. | बेडक्याची तपासणी, क्ष–किरण, टी.टी. टेस्ट, क्ष–किरण |
| | | ब. ५ वर्षाखालची मुले | जुनाट जड खोकला, वजन वभूक कमी होणे, | डॉक्टरकडे पाठवा | |
| ७ रक्ताभिसरण संस्था | अतिरक्तदाब | ४० वरील व्यक्ती | रक्त दाब तपासा | डॉक्टरकडे पाठवा | |
| | सांधे–हृदय ताप | शाळकरी मुले | बदलती–फिरती सांधे सूज, झडपांचा दोषयुक्त आवाज | डॉक्टरकडे पाठवावे, पेनिसिलीन नियमित घ्यायला सांगा | |
| ८. रक्त | रक्तपांढरी | मुले, मोठी माणसे, गरोदर किंवा अंगावर पाजणाऱ्या माता | डोळे–नखे फिकट, दम लागणे, अशक्तपणा | लोहगोळ्या चालू करा, त्रास असल्यास डॉक्टरकडे पाठवा | इंजेक्शन, रक्त भरणे |
| ९. रसग्रंथी | गंडमाळा | १० ते ३० वयात | न दुखणाऱ्या सुजलेल्या गाठी | डॉक्टरकडे पाठवा | क्षयरोग तपासणी व उपचार |
| | इतर ठिकाणी सूज | सर्व वय | तपासणी | | |
| १० मज्जासंस्था (चेतासंस्था) | फिट्स | मुले | | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |
| | मज्जासूज–दारूमुळे | पुरुष–प्रौढ | बधिरपणा, मुंग्या येणे | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |
| ११.अंतःस्त्रावी संस्था | गलगंड | शाळकरी मुले, तरूण–प्रौढ सर्व | गळ्याची तपासणी | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |
| | थॉयरॉईड अतिरेक | तरूण–प्रौढ | डोळे मोठे, हातांची थरथर, जीव घाबरणे | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार, शस्त्रक्रिया |

| अवयव/संस्था | आजार | कोणाला होतो | गावात आजार (लवकर) कसा ओळखायचा? | करायची उपाययोजना | पुढील उपचार |
|---|---|---|---|---|---|
| | मधुमेह | प्रौढ–स्त्री, पुरुष | सतत तहान/ लघवी लागणे, जखम लवकर न धरणे | लघवीची तपासणी | औषधोपचार किंवा शस्त्रक्रिया |
| १२. मानसिक | अंगात येणे | स्त्रिया | घरातून माहिती घेणे | सल्लामसलत | |
| | वेडसरपणा | तरूण, प्रौढ–स्त्री, पुरुष | घरातून माहिती घेणे | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |
| १३. मुलांचे आजार | कुपोषण | ५ वर्षाखालील मुले | दंडाचा घेर तपासणे, वजन तक्ता ताडणे | आहाराबद्दल सल्ला | आहार–उपचार |
| १४. मूत्रसंस्था | मूतखड्यांचा त्रास | सर्व वयात | विशिष्ट ठिकाणी वेदना होण्याची माहिती | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार, शस्त्रक्रिया |
| | पाळीचा त्रास | १५–४५ वर्षे वयापर्यंतच्या स्त्रिया | माहिती विचारा | आवश्यक असल्यास उपचार | |
| १५. स्त्रीजननसंस्था | अवेळी रक्तस्त्राव | १५ वर्षांनंतरच्या सर्व स्त्रिया | माहिती | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार, शस्त्रक्रिया |
| | जास्त पांढरे जाणे | १५ वर्षांनंतरच्या सर्व स्त्रिया | आतून तपासणी | रोगनिदान, उपचार, डॉक्टरकडे पाठवा. | औषधोपचार |
| | अंग बाहेर पडणे | प्रौढ स्त्रिया | आतून तपासणी | सौम्य त्रास असल्यास उपचार, नाहीतर डॉक्टरकडे पाठवा | उपचार, शस्त्रक्रिया |
| | ओटीपोटात सूज | १५–४५ यांतील सर्व स्त्रिया | तपासणीत दुखरेपणा | डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |

| अवयव/संस्था | आजार | कोणाला होतो | गावात आजार (लवकर) कसा ओळखायचा? | करायची उपाययोजना | पुढील उपचार |
|---|---|---|---|---|---|
| १६. पुरुष जननसंस्था | सांसर्गिक आजार | तरुण, प्रौढ | पुरळ, पू, व्रण, लघवीस त्रास | तपासा, शक्य असल्यास उपचार करा किंवा लागल्यास पाठवा. | औषधोपचार |
| | लिंगसांसर्गिक आजार | वयात आलेल्या तरुण, प्रौढ | गाठ, पुळी, व्रण, पू, पुरळ जांघेत अवधाण इ. | तपासा, शक्य असल्यास उपचार करा किंवा लागल्यास पाठवा. | औषधोपचार |
| १७. पचनसंस्था | जठरदाह, जठरव्रण | प्रौढ स्त्री, पुरुष | बेंबीवरच्या भातात जळजळ, दुखणे, तोंडात आंबट पाणी | उपचार करा. वाटल्यास डॉक्टरकडे पाठवा | औषधोपचार |